APMC - Information & Photos

# कृषी उत्पन्न बाजार समिती, सिंदी

## उपबाजारपेठ, सेलु

## वार्षिक अहवाल सन २०२४-२५

प्रथम मी आपणा सर्वांचे मन:पुर्वक स्वागत करतो. महाराष्ट्र शासनाने कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा करून बाजार समित्यांना प्रत्येक वित्तीय वर्षानंतर एक वार्षिक सर्व साधारण सभा बोलाविण्याचा कायदा केल्यामुळे आपल्या समोर समितीचा तेविसावा वार्षिक अहवाल सन २०२४-२५ चा सादर करण्याची संधी मिळाली.

सिंदी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १९४२ ला झाली असून महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम १९६३ मधील तरतुदी नुसार शासनाच्या दिनांक ०९/१०/१९६७ च्या आदेशानुसार अधिसूचित करण्यात आले.

बाजार समितीला, खुल्या अर्थव्यवस्थेमधील स्पर्धांचा सामना करण्यासाठी अनेक सुधारणा करणे गरजेचे आहे. समितीचे बाजार क्षेत्र सेलू तालुक्या पुरते असुन यात एकुण १७५ गावांचा समावेश आहे. समितीच्या कार्यक्षेत्रात सिंदी येथे मुख्यालय व मुख्य कापुस मार्केट आहे. पिपरा रोड, सिंदी येथे धान्य मार्केट आवार असुन, उपबाजार पेठ मार्केट सेलु येथे आहे. समितीचे मुख्य कार्यालय ०.६० हे.आर जागेमध्ये असुन, कापुस मार्केट सुद्धा याच जागेमध्ये भरविण्यात येते. धान्य मार्केट दुय्यम आवार, सिंदी येथे १.६० हेआर. जागेत आहे. उपबाजार पेठ सेलु, आवाराची ५.१९ हे.आर जागा असुन या ठिकाणी धान्य मार्केट, कापुस मार्केट आवार व बैलबाजारचे नियमन केले जाते.

कृषी उत्पन्न बाजार समितीने MACP प्रकल्पा अंतर्गत पुढील नियोजीत विकास कामे पुर्ण केलेली आहे. यात धान्य मार्केट आवार सिंदी येथे लिलाव शेड क्र. १, लिलाव शेड क्र. २, ड्रेनेज, सिमेंट काँक्रीटचे रस्ते, कल्वर्टची कामे, पुरूष स्वच्छता गृह, महिला स्वच्छता गृह, पाण्याकरीता बोरवेल, थंड पाण्याची व्यवस्था, इलेक्ट्रीफिकेशन, गोदाम बांधकाम तसेच उपबाजारपेठ सेलू येथे एक मोठे लिलाव शेडचे बांधकाम.

सन २०२३-२४ मध्ये धान्य शेतमालाची आवक ३,९३,६७० क्विंटल व कापुस आवक ३,५५,९९३ क्विंटल झालेली होती. अहवाल वर्ष सन २०२४-२५ मध्ये एकुण धान्य शेतमाल आवक ३,८९,११९ क्विंटल झालेली असुन एकुण कापुस आवक २,८०,०४३ क्विंटल झालेली आहे. या आर्थिक वर्षामध्ये समितीला एकूण उत्पन्न रू. ३,८६,२७,३०७/- असुन एकूण खर्च रू. २,१८,६०,७५२/- झालेला आहे. या आर्थिक वर्षात समितीला रू. १,६७,६६,५५५/- चा वाढावा झालेला आहे.

समितीमध्ये सन २००३-०४ पासुन, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची शेतमाल तारण योजना सुरू आहे. हंगामाच्या सुरूवातीला शेतकऱ्यांना पैशाची आवश्यकता राहत असल्याने, मार्केटमध्ये शेतमालाची आवक वाढल्यामुळे शेतमालाचे बाजारभाव कमी असतात. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. करीता हाच शेतमाल सुरूवातीला शेतमाल तारण योजनेत ठेवून समितीद्वारे, बाजार भावाच्या / हमी भावाच्या ७५% रक्कम शेतकऱ्यांना देते. यावर नाममात्र दर साल दर शेकडा ६% दराने व्याजाची आकारणी केल्या जाते व बाजार भाव वाढल्यानंतर (६ महिन्याच्या आत) बाजार समिती सदरच्या मालाची विक्री करते. किंवा चढत्या भावात विक्री करण्याच्या हेतूने हाच शेतमाल सुरूवातीला समितीच्या गोदामात साठवून ठेवल्यास शेतकऱ्यांना वाढीव भावाने रक्कम मिळते, यात शेतकऱ्यांचा फायदा होतो. करिता शेतकऱ्यांनी या योजनेचा अवश्य लाभ घ्यावा.



Scanned with OKEN Scanner

बाजार समितीच्या कारकिर्दीत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात झालेले उत्पन्न हे सर्वाधिक असुन वाढावा सुद्धा ऐतिहासीक आहे. आता पर्यंत बाजार समितीला ब वर्गवारी लागू होती परंतू या वर्षात समितीला अ वर्गवारी प्राप्त झालेली असुन यामुळे समितीचा दर्जा उंचावला आहे. मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प अंतर्गत समितीला महाराष्ट्रातून २३ वा क्रमांक प्राप्त झालेला असुन नागपूर विभागातून ६ वा क्रमांक व वर्धा जिल्ह्यातून ०२ या क्रमांकावर आहे. हे सर्व आपल्या सर्वांच्या सहकार्याने शक्य झाले असुन आपला बाजार समितीवर वाढलेल्या विश्वासाची पावती आहे.

समितीने शेतकरी बैलमृत्यू, अपघात या आर्थिक वर्षात करीता २,७०,००० ची भरघोस मदत केली असुन नवीन उपक्रमांच्या माध्यमातुन ही मदत वाढविण्याचा समितीचा मानस आहे.

१) शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.

२) वृक्षसंवर्धन करीता वृक्षारोपण कार्यक्रम राबविणे.

३) शेतकऱ्यांना ऑनलाईन फ्रॉड मुळे नुकसान होऊ नये या करीता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले.

संपुर्ण आवाराची साफसफाई करून स्वच्छतेबाबत सामाजिक भागीदारी व संदेश देण्यात आले.

समिती सदस्य व कर्मचाऱ्यांना विविध प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आले जेणे करून बाजार समितीच्या विकासात भर पडेल.

समितीने मोठ्या प्रमाणात अवैद्य खरेदीवर नियंत्रण आणल्यामुळे बाजार आवाराच्या बाहेर होणाऱ्या खरेदीला आळा बसला आहे यात समितीचे मा.सभापती, मा.उपसभापती इतर पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात वाट आहे.

सर्वांना कृषि उत्पन्न बाजार समिती सिंदी ची माहिती उपलब्ध व्हावी याकरीता समितीची वेब साईट www.apmcsindi.com ची निर्मीती करण्यात आली असून आपल्या सेवेत उपलब्ध आहे.

बाजार समितीच्या क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांची व बाजार घटकांची समिती प्रति आस्था, समितीला दिलेल्या सहकार्याबाबत आम्ही आभारी आहोत. सर्व व्यापारी, आडते, कर्मचारी, मापारी, हमाल व इतर सर्वांचे सहकार्य मिळाले आहे.

तसेच मा. पणन संचालक महाराष्ट्र राज्य पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर, मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था वर्धा, मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सेलू, मा. अधिकारी, कृषी पणन मंडळ, नागपूर यांचे वेळोवेळी विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सर्वांचे आभार व्यक्त करून समितीला प्रगतीकडे नेण्यासाठी पुनश्च आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

**धन्यवाद !**

**केशरीचंदजी बा. खंगारे**

**सभापती**



Scanned with OKEN Scanner

# कृषि उत्पन्न बाजार समिती सिंदी

## उपबाजारपेठ, सेलू

## प्रगती दर्शक अहवाल

### १) झालेली विकास कामे व उपलब्ध सोयी सुविधा –

१) सिंदी व सेलू येथे भारतीय कापूस निगम (C.C.I) चे खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे.
२) एम.ए.सी.पी.अंतर्गत सिंदी येथे नविन धान्य मार्केटची उभारणी व सेलू येथे भव्य लिलाव शेडची उभारणी.
३) सिंदी येथे लिलाव शेडला **विदेही श्रीसंत सखुआई** व सेलू येथे **श्रीसंत केजाजी महाराज** असे नामकरण करण्यात आले.
४) सेलू येथे (ई-ऑक्शन) संगणीकृत लिलाव पद्धतीची अमलबजावणी करण्यात आली.
५) समितीमधिल घोडी काटे पुर्णत: बंद करून शेतमाल इलेक्ट्रॉनिक काट्याने मोजण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली.
६) कापुस मार्केटमध्ये लिलाव सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांना जास्त/योग्य भाव मिळण्याची हमी मिळाली व कापसाची आवक मोठ्या प्रमाणात वाढली.
७) शेतकऱ्यांसाठी मार्केटमध्ये ८०० लि. क्षमतेचे वाटर चिलर लावून मोठ्याप्रमाणात थंड पाण्याची सुविधा करण्यात आली.
८) शेतकऱ्यांचा बैल अपघाताने (सर्पदंश, विज, इलेक्ट्रीक करंट) मरण पावल्यास एका बैलास रू.१०००० आर्थिक मदत देण्यात येते.
९) धान्य शेतमाल विक्री करण्यास आणणाऱ्या शेतकऱ्यासाठी ५ रूपयांमध्ये पोळी-भाजी देण्याची सुविधा.
१०) उपबाजारपेठ, सेलू व दुय्यम धान्य मार्केट आवार, सिंदी येथील धान्य आवार सी.सी.टिव्ही कॅमेरे निगराणीखाली आहे.
११) सेलू तालूक्यातील शेतकरी कुटूंबात मृत्यू झाल्यास मृत शरिर ठेवण्यासाठी शवपेटी सुविधा मुख्यालय सिंदी व उपबाजारपेठ सेलू येथे मोफत उपलब्ध आहे.
१२) इलेक्ट्रिक लाईनचा पुरवठा बंद झाल्यास ४५ के.व्हि. चे उपबाजार पेठ सेलू येथे जनरेटर आहे.
१३) राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत उपबाजार पेठ सेलू येथे शेतकऱ्यांचा शेतमाल तारण योजनेत ठेवण्यासाठी १००० मे.टन चे २ प्रमाणित गोदाम उपलब्ध आहे.
१४) विस्तारीत मार्केट आवारात गेट नं. ३ ते नाल्यापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड आहे
१५) सिंदी धान्य मार्केट मध्ये अडत्यांकरीता तात्पुरत्या खोल्या उपलब्ध आहे.
१६) उपबाजार पेठ सेलू येथे ८० मॅट्रीक टन चा मोठा काटा (वेब्रिज) उपलब्ध आहे.
१७) दैनंदिन बाजार भाव माहिती करीता शाखा सेलू येथे टिकर बोर्ड उपलब्ध.
१८) सर्वच बाजार घटकांना इंटरनेट द्वारे माहिती उपलब्ध व्हावी याकरीता वेबसाईट www.apmcsindi.com उपलब्ध.

### २) पुढील विकास कामाचे नियोजन –

१) सिंदी धान्य मार्केट मध्ये ८० मे.टनचा मोठा काटा (वेब्रिज) बसविणे.
२) सिंदी धान्य मार्केट मध्ये फेब्रिक टिन शेड बसविणे.
३) विस्तारीत मार्केट आवारात नाल्यांपासून गोदामापर्यंत सिमेंट कॉन्क्रीट रोड बांधणे.
४) शेतकऱ्यांना हमी किंमती मध्ये शेतमाल विक्री करिता सोय व्हावी याकरिता प्लेटफार्म.
५) उपशाखा सेलू येथे नविन विस्तारीत आवारात शेतकरी भवन व सभागृह उभारणे.
६) उपशाखा सेलू येथे पुरूष व महिलांकरीता स्वतंत्र प्रसाधन गृह करणे.
७) उपशाखा सेलू येथे ३० के.व्हि. क्षमतेचे सौर उर्जा प्रकल्प उभारणे.
८) शेतकऱ्यांसाठी मार्केटमध्ये २००० लि. क्षमतेचे वाटर चिलर बसविण्यात येणार आहे.

**महेंद्र अ. भांडारकर**
सचीव

**केशरीचंदजी बा. खंगारे**
सभापती

**समस्त संचालक मंडळ बाजार समिती**

Scanned with OKEN Scanner

# कृषी उत्पन्न बाजार समिती,सिंदी

## उपबाजारपेठ, सेलु

## तालूका - सेलु, जिल्हा - वर्धा

**मागील वर्षाचे उत्पन्न, खर्च, वाढावा, आस्थापना दर्शक तक्ता**

| वर्ष | उत्पन्न | खर्च | वाढावा | आस्थापना खर्च | आस्थापना खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| २०१४-१५ | १६५४८४६१/- | ९७१५८६८/- | ६८३२५९३/- | ५०२४४८७/- | ३०.३६ % |
| २०१५-१६ | १७६६८१५४/- | ११४६३३४३/- | ६२०४८१०/- | ५१८१८५६/- | २९.३२ % |
| २०१६-१७ | २२०७७५५५/- | १५३४३८४९/- | ६७३३७०५/- | ६६००९७८/- | २९.८९ % |
| २०१७-१८ | २३३६६७७२/- | १७९२७२५२/- | ५४३९५१९/- | ६९४४८२८/- | २९.७२ % |
| २०१८-१९ | २८६४४१११/- | १७७७७५३७/- | १०८६६५७३/- | ६९३५७८१/- | २४.२१ % |
| २०१९-२० | २४३१४३०५/- | १८७११६०१/- | ५६०२७०४/- | ७४१९८९३/- | ३०.५१ % |
| २०२०-२१ | ३२९९५१२४/- | २१९३२३२४/- | ११०६२८००/- | १०५३२२६९/- | ३१.९२ % |
| २०२१-२२ | ३८१९६११०/- | २३३८६१७७/- | १४८०९९३३/- | ११५५७९९५/- | ३०.२५ % |
| २०२२-२३ | ३६९२६३९६/- | २३३६६३९६/- | १३५६००००/- | १२२८९४०६/- | ३३.२८ % |
| २०२३-२४ | ३६५७०१७१/- | २०१०६५३९/- | १६४६३६३२/- | ७९०३१४०/- | २१.६१ % |
| २०२४-२५ | ३८६२७३०७/- | २१८६०७५२/- | १६७६६५५५/- | ७६०३४४०/- | १९.६८ % |

सचिव
कृ.उ.बा.स.सिंदी